# राष्ट्रीय सेवा योजना

## नियमित कार्यक्रम

## अहवाल

- **राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समिती स्थापना** : भारत सरकार युवा कार्य व खेळ मंत्रालय दिल्ली रा.से.यो. संहिता २००६ भाग -४ प्रकरण -५ मुद्दा क्रमांक ४,४,१,४,२,४,३ अन्वये रा.से.यो. विद्यापीठ कक्षाद्वारे निश्चित झालेले धोरणात्मक निर्णय कृती कार्यक्रम आराखडा आखणे तसेच नियोजन संबंधित सत्र २०१८-१९ करिता राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समितीचे गठन दि. २७ जून २०१८ (बुधवार) रोजी महाविद्यालयात रा.से.यो. अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय डी. नानोटी यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले. या बैठकीत नियमित कार्यक्रम व विशेष शिबीर या अंतर्गत घ्यावयाचे कार्यक्रम या विषयावर चर्चा करण्यात आली.

- **रा.से.यो. तर्फे योग दिन साजरा** : दि. २१-६-१८ स्थानिक श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय अकोला येथील रा.से.यो. पथकाद्वारे २१ जुन २०१८ रोजी ''आंतरराष्ट्रीय योग दिन'' साजरा करण्यात आला.

- **१३ कोटी वृक्ष लागवड उपक्रम** : दि. १ जुलै २०१८ (रविवार) रोजी महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार संपुर्ण राज्यात १३ कोटी वृक्ष लागवड जुलै महिन्यामध्ये करण्यात आले. यादिवशी मोर्णा नदी काठी माननीय पालकमंत्र्यांच्या हस्ते वृक्ष लागवड करण्यात आले. यावेळी अकोल्याचे जिल्हाधिकारी मा.श्री. अस्तिक कुमार पाण्डेय यांच्या मार्गदर्शनाखाली वनविभाग व सामाजिक वनीकरण विभाग अकोला ह्यांच्या वतीने मोर्णा नदीच्या काठी वृक्ष लागवडीचा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमात प्राचार्य डॉ. व्ही.डी. नानोटी, रा.से.यो. चे क्षेत्रीय समन्वयक प्रा.डॉ. सुधीर कोहचाळे, कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. समाधान मुंडे, प्रा.डॉ. रश्मी जोशी (सावलकर), रा.से.यो. चे स्वयंसेवक आणि महाविद्यालयीन शिक्षकवृंद या वृक्ष लागवड महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

- **एक दिवसीय महिला सक्षमीकरण कार्यशाळा** : दि. २० जुलै २०१८ रोजी ''सायबर क्राईम एंड वूमन सेफ्टी'' ह्या कार्यशाळेचे आयोजन रासेयो व अकोला जिल्हा पोलीस दल-दामिनी २ पथकाच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

- **वृक्ष रक्षाबंधन सोहळा** : दि. २७-८-२०१८ रोजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनाच्या स्वयंसेवकांनी वृक्ष रक्षाबंधन म्हणजे राखी बांधण्याचा कार्यक्रम महाविद्यालयाच्या परिसरात आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाकरिता राष्ट्रीय सेवा योजनाच्या स्वयंसेवकांनी मोठ्या आकाराच्या सुंदर राख्या तयार करून महाविद्यालय परिसरातील सर्व झाडांना राख्या बांधल्या.

- **स्वच्छ भारत अभियान पंधरवाडा** : विभागीय संचालक, युवा कल्याण व क्रीडा विभाग, भारत सरकार नवी दिल्ली यांच्या पत्रानुसार महाविद्यालयातील रा.से.यो. च्या स्वयंसेवकांनी 'स्वच्छ भारत अभियान पंधरवाडा' दि. १ ते १५ ऑगस्ट २०१८ या दरम्यान महाविद्यालयात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये ''स्वच्छता शपथ; महाविद्यालयीन परिसर स्वच्छता, वर्ग खोल्या, प्रयोगशाळा, ग्रंथालय, बाथरूम, महाविद्यालयातील सभागृह, महाविद्यालयाच्या समोरील रस्ता व इतर परिसर ची स्वच्छता करण्यात आली; ''स्वच्छ भारत अभियान पंधरवाडा; स्वच्छता पाळा रोगराई टाळा अश्या विषयावर मार्गदर्शने; बसस्थानकासमोरील नजीकच्या गांधी जवाहर उद्यानामधील

राष्ट्रपिता महात्मा गांधी व पंडित जवाहरलाल नेहरू या महापुरूष्याच्या पुतळ्यावर पाणी मारून स्वच्छता करण्यात आली. तसेच उद्यानाच्या सर्व परिसराची स्वच्छता करण्यात आली. दि. १५-८--२०१८ (बुधवार) रोजी स्वतंत्र दिना निमित्त प्राचार्य डॉ. व्ही.डी. नानोटी यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. ''स्वच्छ भारत, स्वस्थ भारत'' या वाक्याचा उल्लेख करून रा.से.यो. च्या स्वयंसेवकांनी दि. १५-८-२०१८ ला ''स्वच्छ भारत अभियान पंधरवाडा'' संपन्न करण्यात आला.

- **शिक्षक दिन** : दि. ५-९-२०१८ रोजी भारताचे महान सुपुत्र डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिनाच्या निमित्याने शिक्षक दिन साजरा करण्यात आला.

- **रा.से.यो. वर्धापन दिन** : दि. २४-९-२०१८ रोजी वर्धापन दिन साजरा करण्यात आला या दिना निमित्त स्वच्छता हीच सेवा अभियान राबविण्यात आले, यामध्ये प्रामुख्याने स्वच्छता विषयक माहितीपर पथनाट्य, रॅलीचे आयोजन, निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा व चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या.

- **गांधी जयंती व लाल बहादूर शास्त्री जयंती** : महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंतीनिमित्त २ ऑक्टोबर २०१८ ला रा.से.यो. च्या वतीने स्वच्छता रॅलीचे आयोजन व ठिकठिकाणी स्वच्छता पथ नाट्याचे सादरीकरण करण्यात आले.

- **संविधान सप्ताह** : दि. २४ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०१८ या दरम्यान ला रा.से.यो. पथकाद्वारे संविधान सप्ताह साजरा करण्यात आला. दि. २४ नोव्हेंबर ला संविधान वाचन करण्यात आले. संविधान चा मान राखण्या बद्दल शपथ देण्यात आली. वक्तृत्व स्पर्धा व निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. विद्यार्थिनींनी सुद्धा आपल्या वक्तृत्वात भारतीय घटनेबाबत सखोल माहिती दिली.

- **जागतिक एड्स दिवस - रेड रिबन क्लब ची स्थापना** : १ डिसेंबर २०१८ जागतिक एड्स दिवसचे औचित्य साधून 'रेड रिबन क्लब' ची स्थापना व गठन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. व्ही.डी. नानोटी यांनी विद्यार्थ्यांना समाजात एड्स बद्दल जनजागृती करावयास उद्‌बोधित केले.

- **D.M.C. ची कार्यशाळा** : दि. १४-१२-२०१८ रोजी संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावतीमध्ये DMC ची एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. रा.से.यो. चे क्षेत्रीय समन्वयक डॉ. सुधीर कोहचाले ह्यांनी रेसौर्स पर्सन म्हणून कार्य केले. ८ ते १० वेगवेगळ्या ठिकाणी DMC च्या कार्यशाळा घेण्यात आल्या. श्री. रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयातील हे पथक आहे विद्यापीठातील हे सर्वात पहिले गठीत केलेले एकमात्र पथक आहे.

- **रा.से.यो. चे विशेष शिबीर** : रा.से.यो. पथकाचे विशेष शिबीर १६ ते २३ डिसेंबर २०१८, ग्राम आपोती (खुर्द) येथे घेण्यात आले. शिबिरात १०० स्वयंसेवक होते त्यापैकी ५७ मुली व ४३ मुलांनी सहभाग घेतला. गावकऱ्यांमध्ये स्वच्छते विषयी आणि पाणी संवर्धन करण्याबाबत जनजागृती करण्यात आली. महिला मेळाव्यात कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी सावलकर ह्यांनी गावातील मुलींना व महिलांना अगरबत्ती बनविण्याचे व कागदापासून पिशव्या बनविण्याची कार्यशाळा घेतली जेणेकरून घरगुती उद्योग महिलांना मिळावे. रा.से.यो. पथकाने वनराई बंधारा बांधून व गाव स्वच्छता करीत गाव फेरी काढून श्रमदान केले.

- **रक्तदान शिबीर** : दिनांक २४-१२-२०१८ ला रा.से.यो. पथकाद्वारे श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयात माननीय प्राचार्य श्री म.गो. जोशी ह्यांच्या स्मृति प्रित्यर्थ रक्तदान शिबिराचे आयोजन दरवर्षी करण्यात येते. ३७ रक्तदात्यांनी ह्या शिबिरात रक्तदान केले.

- **मोर्णा महोत्सव** : जिल्हाधिकारी कार्यालय अकोलाच्या वतीने २९-१२-२०१८ ला मोर्णा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. रोसेयोच्या विद्यार्थीनीच्या व शिक्षकांनी, कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी ह्यांच्या मार्गदर्शनाखाली मोर्णा महोत्सवात गीत गायन व नृत्य द्वारा आपला सहभाग नोंदविला.

- **रस्ता सुरक्षा अभियान** : दि. ८-१-२०१९ रोजी महाविद्यालयात अकोला शहर वाहतूक शाखेचे श्री. विलास पाटील ह्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अकोला जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. एम. कलासागर ह्यांच्या संकल्पनेतून हा अभियान राबविण्यात आला. रस्त्यावर सुरक्षा कशी ठेवावी, अपघात झाल्यास काय करावे याबद्दलचे धडे दिले.

- **जिल्हा विशेष शिबिर** : श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाच्या तीन विद्यार्थिनी कु. प्रगती नवलकर, कु. मनिषाकुमारी गुडधे आणि कु. स्नेहल गावंडे ह्या १८ ते २५ जनवरी २०१९ या दरम्यान आयोजित विद्यापीठस्तरीय जिल्हानिहाय शिबिरात ग्राम सोनाला येथे सहभागी झाल्या.

- **अकोला पक्षी निवडणूक** : दि. १९-१-२०१९ रोजी अकोला निवडणूक कार्यालय व निसर्गकट्टा ह्यांच्या संयुक्त विद्यमाने अकोल्याचा पक्षी निवडण्यासाठी एक आगळीवेगळी ''पक्षी निवडणूक'' शहराच्या प्रत्येक शाळेत व महाविद्यालयात घेण्यात आली. श्री रा.ल.तो. महाविद्यालयात विक्रमी मतदान झाले. रिंगणात पांच पक्षी उमेदवार होते, प्रत्येक उमेदवाराचे प्रचार करण्याकरिता पांच विद्यार्थ्यांची नेमणूक केली गेली. गाय बगळा हा पक्षी निवडून आला. श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. आरती कडू हिला उत्कृष्ट प्रचार केल्याबद्दल अकोला जिल्हाधिकारी कार्यालयात गौरविण्यात आले.

- **राष्ट्रीय मतदान दिन** : दि. २५-१-२०१९ रोजी जिल्हाधिकारी अकोलाच्या वतीने राष्ट्रीय मतदान दिनानिमित्त रॅली काढण्यात आली. ह्या रॅलीमध्ये श्री रा.ल.तो. महाविद्यालयाचे रा.से.यो. चमूनी सहभाग नोंदविला व नारे लावत आणि पोस्टर्स च्या माध्यमांनी जनजागृती केली.

- **संत गाडगेबाबांच्या दुर्मिळ छायाचित्रांची प्रदर्शनी** : दि. ४-२-२०१९ रोजी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या अध्यासन केंद्राच्या वतीने श्री रा.ल.तो. महाविद्यालयात गाडगे बाबांच्या दुर्मिळ छायाचित्रांच्या प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. ह्या प्रदर्शनीचे उद्घाटक म्हणून माननीय श्री. दिलीपजी काळे, रा.से.यो. सल्लागार समिती सदस्य तसेच दिरेक्टर ''गाडगे बाबा अध्यासन केंद्र'' अमरावती विद्यापीठ हे होते.

- **रस्ता सुरक्षा सप्ताह २०१९** : रस्ता सुरक्षा सप्ताहनिमित्त पथनाट्याचे सादरीकरण ८ फेब्रुवारी २०१९ रोजी स्थानिक श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय अकोला चे रा.से.यो. पथक व जिल्हा उप प्रादेशिक वाहन कार्यालय यांचे संयुक्त विद्यमाने रस्ता सुरक्षा अभियानाचे निमित्त जनजागृती अभियान राबविण्यात आले. या अभियाना अंतर्गत रा.से.यो. स्वयंसेवकांद्वारे पथनाट्याचे आयोजन व सादरीकरण शहरातील विविध ठिकाणी प्रामुख्याने रेल्वे स्थानक, बस स्थानक, सिटी कोतवाली, गांधी रोड तसेच महाविद्यालयात सादरीकरण करण्यात आले. रस्ता सुरक्षा सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी दि. १२-२-२०१९ रोजी रांगोळी स्पर्धा आणि घोषवाक्य स्पर्धेचे आयोजन रा.से.यो. च्या महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी सावलकर ह्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले व दोन्ही स्पर्धकांपैकी १ले, २रे व ३ रे पारितोषिक देण्यात आले.

- **रा.से.यो. व DMC सहल** : दिनांक २१-२-२०१९ ला रा.से.यो. व DMC च्या विद्यार्थ्यांची सहल पातुर तलाव, वन्य प्राण्यांचे इंटरप्रिटेशन केंद्राला नेण्यात आली. ह्या सहली दरम्यान वन्यजीव संरक्षण आणि विविधता बद्दल धडे देण्यात आले.

- **मतदान जनजागृती शपथ** : श्री संत गाडगे बाबा विद्यापीठ रा.से.यो. पथकाकडून मिळालेल्या पत्रानुसार ज्या विद्यार्थ्यांची मतदार यादीत नव्याने नोंद झाली आहे अश्या विद्यार्थ्यांना दि. ०३-०३-२०१९ ला मतदान जनजागृती पर शपथ देण्यात आली, कि ते स्वत: मतदान करतील व इतर नागरिकांना सुद्धा मतदानाचा हक्काबद्दल माहिती देतील व मतदान करून आपले भारतीय नागरिक होण्याचे कर्तव्य पूर्ण करतील. माननीय प्राचार्य डॉ. व्ही.डी. नानोटी ह्यांनी विद्यार्थ्यांकडून ही शपथ घेतली.

- **दोन दिवसीय महिला सक्षमीकरण कार्यशाळेत सहभाग** : दि. २५ व २६ मार्च २०१९ ला अमरावती विद्यापीठाच्या रा.से.यो. कार्यालय द्वारे दोन दिवसीय महिला सक्षमीकरण कार्यशाळा घेण्यात आली. ह्या कार्यशाळेत श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयातील रा.से.यो. च्या दोन विद्यार्थीनी कु. शिवानी गंगमवार व कु. अंकिता गजभिये ह्यांनी आपला सहभाग नोंदविला. महिलांनी कसे सक्षम व्हावे व प्रत्येक कार्यात त्यांचा सहभाग व्हावा त्याकरिता कार्यशाळेत त्यांना मनोबल वाढविण्याकरिता धडे देण्यात आले.

- **रा.से.यो. समारोप** : दि. ३१-३-२०१९ रोजी रा.से.यो. समारोपीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रम अधिकारी यांनी विस्तृत अहवाल वाचन केले. रा.से.यो. समारोपीय कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नानोटी सर यांच्या अध्यक्षतेत पार पडला.

**डॉ. समाधान एल. मुंडे**
**डॉ. रश्मी पी. जोशी (सावलकर)**
**प्रा. शैलेश आर. जयस्वाल**
कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना

# राष्ट्रीय सेवा योजना

## विशेष शिबीर - ग्राम आपोती (खुर्द)

# शिबीर अहवाल

**(दि. १६ डिसेंबर २०१८ ते २३ डिसेंबर २०१८)**

**दि. १६-१२-२०१८ (रविवार) :**

ग्राम आपोती (खु.) येथे दिनांक १६-१२-२०१८ रोजी विद्यार्थ्यांचे आगमन, यानंतर विद्यार्थ्यांची नोंदणी व पूर्वतयारी करण्यात आली. सर्वप्रथम कार्यक्रम परिसर कर्मयोगी बाबासाहेब आपोतीकर विद्यालय येथे स्वच्छता करण्यात आली. तसेच गावकऱ्यांसोबत चर्चा व प्रकल्पांची पाहणी करण्यात आली. ''स्वच्छ भारत स्वस्थ भारत'' अभियान अंतर्गत ग्राम आपोती (खु.) येथे राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाची व कार्यक्रमाची माहिती कार्यक्रम अधिकाऱ्यांनी गावकऱ्यांना दिली.

**दि. १७-१२-२०१८ (सोमवार) :**

ग्राम आपोती (कु.) येथे श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराचे उद्‌घाटन १७ डिसेंबर २०१८ रोजी पार पडले. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्ष म्हणून मा.डॉ. आर.बी. हेडा (दंतशल्य चिकित्सक तथा अध्यक्ष दि बी.जी.ई. सोसायटी, अकोला) हे उपस्थित होते व उद्घाटक म्हणून क.शि.प्र. संस्था आपातापा चे अध्यक्ष श्री. दामोधर कडू उपस्थित होते. मा.ॲड. श्री. मोतीसिंहजी मोहता (मानद् सचिव दि बी.जी.ई. सोसायटी, अकोला) व मा.डॉ. व्ही.डी. नानोटी (प्राचार्य श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला हे प्रमुख पाहुणे म्हणून कार्यक्रमाचे उद्घाटनास लाभले होते. कार्यक्रमाची शोभा वाढविण्यास इतर मान्यवर सुद्धा उपस्थित होते. सौ. लक्ष्मीताई संजय घुसे (सरपंच), डॉ. उमेशराव वि. बोपटे (उपसरपंच), श्री. कैलासराव वि. अपोतीकर (पोलीस पाटील), डॉ. शांतारामजी बुटे (संस्थापक क.शि.प्र. संस्था आपातापा) हे सुद्धा उपस्थित होते.

पहिल्या दिवसाच्या संध्याकाळच्या सत्रात ७.०० वा. आचार्य ह.भ.प. श्री ज्ञानेश्वरजी महाराज तायडे यांचे ''संस्कारमय आध्यात्मिक ज्ञान'' या विषयावर उद्‌बोधन शिबिरार्थींना लाभले होते. या कार्यक्रमात गावातील मंडळी आणि रासेयो शिबिरार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**दिनांक १८-१२-२०१८ (मंगळवार) :**

तिसऱ्या दिवसाच्या सकाळच्या सत्रात प्रार्थना, स्फूर्तीगीते व रॅलीचे आयोजन करण्यात आले आणि त्याचबरोबर श्रमदानाकरिता गावातील नाल्यावर जागा पाहून वनराई बंधारा बांधण्याचे कामाला सुरूवात करण्यात आली. या शिबिरात श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे समन्वयक व रासेयोचे क्षेत्रीय समन्वयक डॉ. सुधीर कोहचाळे यांनी आपल्या प्रशिक्षित स्वयंसेवकांसोबत प्रात्यक्षिके दाखवत आपत्तीला न डगमगता कशाप्रकारे सामोरे जाता येऊ शकते याबद्दल मार्गदर्शन केले.

दुपारच्या बौद्धिक सत्रात श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाचे प्रा.डॉ. हरीश मालपाणी (सूक्ष्मजीवशास्त्र विभाग) ''AIDS समज व गैरसमज'' या विषयावर उद्बोधन करण्यासाठी शिबिरार्थींना लाभले होते.

''आपले विश्व'' या विषयावर उद्बोधन करण्याकरिता श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाचे प्रा. शैलेश जयस्वाल (भौतिकशास्त्र विभाग) हे आले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना आपले विश्व, ब्रह्मांड, आकाशगंगा याविषयी माहिती दिली. तसेच

ग्रह-तारे व नत्रक्षां विषयी माहितीसुद्धा त्यांनी शिबिरार्थींना दिली. सायंकाळच्या सत्रात प्रमुख वक्त्या म्हणून डॉ. स्वप्ना लांडे यांचे ''वैज्ञानिक दृष्टीकोन व जादूटोणा विरोधी कायदा'' या विषयी मार्गदर्शन लाभले.

**दि. १९-१२-२०१८ (बुधवार) :**

चौथ्या दिवसाच्या सकाळच्या सत्रात प्रार्थना, स्फूर्तीगीते त्याचबरोबर प्राणायामाचे धडे मा. संजय हेडाऊ सर यांनी दिले व स्वच्छता रॅलीचे आयोजन करण्यात आले आणि त्याचबरोबर गावातील नाल्यावर जाऊन वनराई बंधाराचे श्रमदान करण्यात आले. दुपारच्या सत्रात गावातील गावकरीसाठी उन्नत भारत अभियानांतर्गत शेतीपूरक मरस्त्यव्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेमध्ये श्री. सुरेश आर. भारती (सहा. आयुक्त मस्त्यव्यवसाय) यांनी मस्त्यव्यवसाय शेतीपूरक जोड धंदा व रोजगार संधी या विषयावर मार्गदर्शन केले आणि त्याचबरोबर श्री. दिनेश घोपे यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली आणि अक्यरिअम बांधणी कशी करायची याचे प्रात्यक्षिक करून दाखवले.

''ताण-तणाव मुक्तीचे व्यवस्थापन'' या विषयावर मार्गदर्शनासाठी श्रीमती ल.रा.तो. वाणिज्य महाविद्यालयाचे प्रा.डॉ. महेश डाबरे हे आले होते.

**दि. २०-१२-२०१८ (गुरुवार) :**

गावातील महिलांसाठी ''महिला मेळाव्याचे'' आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेमध्ये सुंदर माझे आंगण ही रांगोळी स्पर्धा घेंण्यात आली आणि गावातील महिलांना दैनंदिन जीवनामध्ये स्वत:च्या प्रकृतीची काळजी कशी घेतली पाहिजे या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले तसेच लघु उद्योग कार्यक्रमांतर्गत पेपर बॅग्स बनवणे यावर कार्यशाळा घेण्यात आली.

दुपारी ३.०० वा. व्यसनमुक्ती आंदोलन या कार्यक्रमासाठी डॉ. अजय उपाध्याय हे मार्गदर्शक म्हणून लाभले होते. तरूण वयातच या व्यवसांना आपण कसे बळी पडतो व त्यानंतर व्यसनाधीन होतो, हे अगदी सविस्तर समजावून सांगितले व अंमली पदार्थांचे कशा प्रकारे व्यसन लागते ते शास्त्रीय पद्धतीने समजावून सांगितले. व्यसनामुळे होणारी शरीराची हानी कशी न भरून काढण्यासारखी असते हे सांगत व्यसनांपासून दूर राहण्याचे शिबिरार्थींना आवाहन केले.

आजघडीला भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील सर्वात मोठे आणि महत्वाचे आव्हान म्हणजे रूपयाचे अवमूल्यन किंवा घसरण. हाच मुद्दा धरून डॉलरच्या तुलनेत रूपयाची घसरण का होते व घसरण झाल्यामुळे अर्थव्यवस्थेवर काय परिणाम होतात, याबद्दल श्री. विजय रुईवाले यांनी सखोल मार्गदर्शन केले.

**दि. २१-१२-२०१८ (शुक्रवार)**

विद्यार्थ्यांसाठी ''विद्यार्थी सुरक्षा आणि सुरक्षात्मक उपाय योजना'' विषयावर मा.श्री. गोपाळ मुकुंदे (पो.का. दामिनी पथक अकोला पोलीस) यांनी मार्गदर्शन केले आणि त्याचप्रमाणे मा.श्री. विशाल मोरे (पो.का. दामिनी पथक अकोला पोलीस) यांनी ''सायबर क्राइम आणि विद्यार्थी'' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

सायंकाळच्या सत्रात ''कायदेविषयक मार्गदर्शन'' ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे मानद सचिव मा.ॲड. मोतीसिंहजी मोहता तर मार्गदर्शक म्हणून न्यायाधीश मा. अमित कोकरे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण प्रभारी सचिव न्यायाधिश मा.डी.एस. दाभाडे, मा. के.पी. डवणे व मा.जे.व्ही. मस्के, मा. दामोदर कडून, मा. अनिल तापडिया, प्राचार्य मा.डॉ. विजय नानोटी, उपसरपंच मा. उमेश बोपटे, पोलीस पाटील मा. कैलासराव अपोतीकर आदी उपस्थित होते.

**दि. २२-१२-२०१८ (शनिवार) :**

सातव्या दिवसाच्या सकाळच्या सत्रात प्रार्थना, प्राणायाम, वेगवेगळे योगासने सौ. विभा पाटील मॅडम यांनी करून

दाखवले आणि शिबिरार्थींनी सुद्धा केले आणि त्याचबरोबर श्रमदानाकरिता गावातील लोणार नाल्यावर जाऊन बंधाराचे जवळपास ५० फूट लांब, ३.५ फूट उंच आणि ४ फूट रूंद वनराई बंधाराचे काम पूर्ण करण्यात आले. हा बंधारा बांधताना गावातील सरपंच सौ. लक्ष्मीताई घुसे, उपसरपंच डॉ. उमेश बोपटे ग्रामपंचायत सदस्यांची त्याचप्रमाणे गावातील मंडळींचे सहकार्य लाभले. या वनराई बंधाऱ्याचे आर्थिक मुल्यांकन जवळपास ४०,०००/- ते ५०,०००/- काढण्यात आले आहे. या शिबिराचा बंधारा बांधण्याचा मुख्य उद्देश म्हणजे सर्व गावातील गुरांना पिण्याचे पाणी, गावातील लोकांसाठी पिण्याचे पाणी, शेतीला पाणी या हेतूने एक छोटा तलावावर वनराई बंधारा बांधून पाणी अडवण्यात आले आहे आणि या वनराई बंधाराचा लाभ सर्व गावकऱ्यांना होत आहे.

''आम्ही व आमचे संविधान'' या विषयावर मार्गदर्शनासाठी श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाचे प्रा. विनोद देवताळे (रसायनशास्त्र विभाग) हे आले होते. भारतीय संविधान समजावून सांगताना त्यांनी इतिहासातील घडामोडींचा सविस्तरपणे आढावा घेतला. भारतीय संविधान तयार करण्यासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतलेल्या अथक परिश्रमांवरही त्यांनी प्रकाश टाकला.

''आधुनिक तंत्रज्ञान व पर्यावरणाचा ऱ्हास'' ह्या विषयावर मार्गदर्शनासाठी श्री शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्रा. डॉ.आय.ए. राजा आले होते. आजच्या या वाढत्या लोकसंख्येचा पर्यावरणावर होणारा आघात व यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या या बाबींवर त्यांनी विद्यार्थ्यांसोबत चर्चा केली. तसेच वाढत्या रासायनिक खतांचा सजीव सृष्टीवर होणारा परिणाम, जंगलतोड, वाढते तंत्रज्ञान यांच्या दुष्परिणामांची जाणीव त्यांनी शिबिरार्थींना करून दिली.

या दिवशीचे शेवटचे सत्र सांस्कृतिक कार्यक्रमांचे होते. या कार्यक्रमात बहुतांशी स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. शिबिरार्थींनी गीत-गायन, नृत्य आणि नाटिका सादर केल्या. एका पेक्षा एक दर्जेदार कार्यक्रमांनी या संध्येला रंगत आली. सांस्कृतिक कार्यक्रमांना गावकऱ्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

**दि. २३-१२-२०१८ (रविवार) :**

२३ डिसेंबर रोजी दुपारच्या सत्रात रासेयोच्या विशेष शिबिराचा समारोप कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाला अध्यक्षस्थानी मा.डॉ. व्ही.डी. नानोटी (प्राचार्य, श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला) हे लाभले होते. तसेच मा.श्री. सत्यनारायणजी बाहेती (कार्य. सदस्य, दि बी.जी.ई. सोसायटी, अकोला), मा.डॉ. संजय तिडके (जिल्हा समन्वयक, रासेयो, अकोला), मा.डॉ. सुधीर कोहचाळे (क्षेत्रीय समन्वयक, रासेयो, अकोला) या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. समाधान एल. मुंडे व प्रा.डॉ. रश्मी पी. सावलकर तसेच सह-कार्यक्रम अधिकारी प्रा. शैलेश आर. जयस्वाल व प्रा. सोनाली एन. गवांदे हे देखील उपस्थित होते.

विशेष शिबिर ग्राम आपोती (खु.) या आठ दिवसीय शिबिराचा विस्तृत अहवाल कार्यक्रम अधिकारी डॉ. समाधान मुंडे यांनी प्रस्तुत केला. समारोपीय कार्यक्रम हा विशेषत: विद्यार्थ्यांचे मनोगत आणि सत्काराचा असतो म्हणून या ठिकाणी काही विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

**डॉ. समाधान एल. मुंडे**
**डॉ. रश्मी पी. जोशी (सावलकर)**
**प्रा. शैलेश आर. जयस्वाल**
कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना